**शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची माहिती**
**आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.**
**सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.**

**विभागाची आवश्यकता:-**

शासनाच्या (मंत्रालयीन विभाग) सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अधिकाऱ्यांची आदिवासी विकास विभागाअंतर्गत अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांनी जमातीचा दावा अवैध ठरविल्यानंतर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसाच्या आत संबंधित उमेदवारास अपील दाखल करण्यासाठी महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देणे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० आणि सुधारित अधिनियम २०२६ कलम ६ ख च्या तरतुदीनुसार नव्याने निर्माण करण्यात आलेल्या सात अपिलीय प्राधिकरणांचे कामकाज पार पाडण्याकरिता त्यांच्या कार्यक्षेत्रात प्रशासकीय सदस्य म्हणून प्रथमत: एक वर्षाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी | पदसंख्या |
|---|---|---|
| १. | मंत्रालयीन विभागातील सह-सचिव किंवा यापेक्षा वरीष्ठ संवर्गातील इतर विभागातील अधिकारी | ७ |

**आवश्यक अर्हता:-**

१) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांनी प्रमाणपत्र पडताळणीचा दावा अवैध ठरविल्यानंतर संबंधित उमेदवाराने दाखल केलेल्या अपीलावर कार्यवाही करणे अपेक्षित असल्याने आदिवासी संस्कृती, आदिवासी प्रथा, मानववंशशास्त्र आणि मानवजातीशास्त्र यांचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

२) संबंधित सेवानिवृत्त अधिकारी यांना मराठी व इंग्रजी भोषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नवीन तंत्रज्ञान उदा:- Chat Gpt व Gemni इत्यादी AI tools यांचा वापर करण्याबाबत माहिती असणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक:-सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/ आरस्थामं(का १३), दिनांक १० जून, २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार एक वर्षासाठी करण्यात येणार असून त्याबाबतचे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून एक वर्ष कालावधीसाठी ही नियुक्ती राहील व सदर नियुक्ती कालावधी ३ वर्षापर्यंत वाढविण्यात येईल.

२) विभागास आवश्यकता असलेली अर्हता धारण करणाऱ्या वय वर्षे ६५ च्या आतील सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

३) आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरीता अर्ज विहित नमुन्यात कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावे अथवा टंकलिखित करुन आदिवासी विकास विभागास सादर करावा.

४) आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराने सदर पदाकरीता विहित नमुन्यातील अर्ज दिनांक ०३.११.२०२६ पर्यंत सह सचिव (आदिवासी विकास विभाग) रुम नं १३१, १ ला मजला (विस्तार इमारत), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, या पत्त्यावर पोहोचतील अशा रितीने टपालाने अथवा व्यक्तीशः आणून द्यावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२०२३३७७ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही, तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

५) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या अधिकाऱ्यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

६) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल व त्याबाबतची नामिकासूची (पॅनेल) तयार केली जाईल. या सूचीतील योग्य उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

८) अपिलीय प्राधिकरणातील कामकाजाचे स्वरुप व जबाबादारी पहाता, करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी यांनी सदर सेवेचा राजीनामा दयावयाचा असल्यास, त्याबाबत दोन महिन्यांची नोटीस प्रथमतः दयावी.

९) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी हे आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

१०) सदर नियुक्तीच्या अनुषंगाने पारिश्रामिक व भत्ते आणि इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का १३), दिनांक १० जून, २०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

**(शंकर त्र्यं. जाधव)**
**सह सचिव, आदिवासी विकास विभाग,**
**रुम नं. १३१, १ ला मजला विस्तार इमारत**
**मंत्रालय, मुंबई-३२.**

# अर्जाचा नमुना

सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता अर्ज.

| |
|---|
| उमेदवाराने<br>अलीकडील<br>काळातील स्वत:चे<br>छायाचित्र येथे<br>चिकटवावे. |

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव : ..................................................................

२) अर्जदाराचा पत्ता : ..................................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम : ..................................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक : ..................................................................

५) जन्म दिनांक व वय : ..................................................................

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय ? होय/नाही

७) अनुभव :..................................................................

विवक्षित प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी करार पध्दतीने नियुक्तीने जाहिरात /सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:-

दिनांक:-

अर्जदाराची स्वाक्षरी

**आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.**
**सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.**

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देणे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० तसेच सुधारित अधिनियम २०२६ कलम ६ ख मध्ये अपील प्राधिकरणाची तरतूद करण्यात आली आहे.

जात पडताळणी समितीच्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती असा आदेश मिळाल्याच्या ९० दिवसाच्या आत अपिलीय प्राधिकरणासमोर अपील दाखल करु शकेल. अशा अपीलावरील कार्यवाहीसाठी न्यायीक सदस्य व प्रशासकीय सदस्य असलेले अपिलीय प्राधिकरणांची निर्मिती करण्यात आली आहे. अपिलीय प्राधिकरणावरील प्रशासकीय सदस्य या पदावरील पद मंत्रालयीन विभागातील सेवानिवृत्त सह सचिव (एस-२७) किंवा यापेक्षा वरीष्ठ संवर्गातील इतर विभागातील अधिकारी यामधून भरावयाचे प्रस्तावित आहे.

अपिलीय प्राधिकरणाचे कामकाज पारपाडण्याकरीता आदिवासी संस्कृती, आदिवासी प्रथा, मानववंशशास्त्र आणि मानवजातीशास्त्र यांचे ज्ञान असणाऱ्या मंत्रालयीन विभागातील सेवानिवृत्त सह सचिव या संवर्गातील व इतर विभागातील ७ अधिकाऱ्यांची, मनुष्यबळ पूरविण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे. यासंदर्भात ई-निविदा दिनांक २६.१०.२०२६ पासून https://mahatenders.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-

(शंकर त्र्यं. जाधव)
सह सचिव, आदिवासी विकास विभाग,
महाराष्ट्र शासन
०२२-२२०२३३७७